


श्रीसमर्थ रामदासकृत

# करुणाष्टके आणि बोधवचने



श्रीसमर्थ रामदासकृत

# करुणाष्टके आणि बोधवचने

सातम उद्योग™
www.satamudyogbooks.com

- ई-बुक आवृत्ती

- संकलन व संपादन : गुरुदास

- प्रकाशक : हेमंत स. साटम

- मुद्रक : साटम उद्योग
  २०३, अमित इंड. इस्टेट,
  लालबाग, मुंबई-४०० ०१२.
  ८१६९९ ८४९२७

# करुणाष्टकांचं अंतरंग

**श्री**संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ तसेच संत तुकाराम आणि श्रीसमर्थ रामदास हे पाच संत महाराष्ट्रात सर्वांनाच ठाऊक आहेत. माझ्या लहानपणी या संतांचे अभंग, ओवीरुप ग्रंथ किंवा इतर अन्य ग्रंथ संपदेचा तिळमात्र परिचय मला नव्हता, तरीसुद्धा या संतांचं केवळ कल्पनाचित्र पाहिलं तरी त्यामुळे आपोआप माझी मान लवत असे. या संतांचं हे मोठेपण इतकं गहिरं आहे.

संतपण हे नेहमी देवपण घेऊनच जगात वावरत असतं. म्हणूनच सर्वसामान्य माणूस त्यांच्या पायी माथा ठेवतो. संतांचे ग्रंथ, त्यांचे अभंग, त्यांचा लौकिक हा त्यांच्या देवपणापुढे गौण ठरतो. मुख्य म्हणजे जगावर हातचं काहीही राखून न ठेवता अपार प्रेम करण्याचा त्यांचा स्वभाव आणि माणसाचं दु:ख, दैन्य पाहून कळवळणारं आणि करुणेने सदैव ओथंबलेलं त्यांचं ह्रदय हीच या संतांची फार मोठी श्रीमंती असते. या अपार श्रीमंतीमुळेच या पाच संतांनी गेली सात-आठशे वर्षे महाराष्ट्रावर सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक असे विविध संस्कार करुन अनेक पिढ्यांचं आयुष्य संपन्न केलं. म्हणूनच आपण या संतांना आपल्या संस्कृतीचे पंचप्राण मानतो.

या उपरोक्त पाच संतांपैकी समर्थ रामदास यांनी पूर्वसूरींपेक्षा थोडी वेगळी वाट धरली. त्यांनी

परमार्थाबरोबरच प्रपंचाचंही विज्ञान लोकांसमोर मांडलं. प्रपंचातला व्यवहार सांभाळून परमार्थ कसा साधायचा, याचं मोठं सुंदर तत्वज्ञान त्यांनी आपल्या दासबोध या ग्रंथातून मोठ्या प्रभावीपणे मांडलं आहे. दासबोध हा श्रीसमर्थ रामदासांनी रचलेला मोठा ग्रंथराज आहे. दासबोधा खालोखाल प्रसिद्धी व अखंड लोकप्रियता पावलेल्या समर्थांच्या काव्यरचना म्हणजे मनाचे श्लोक आणि करुण रसाने ओतप्रोत असलेली करुणाष्टकं होत.

पन्नास-साठ वर्षांपूर्वी मनाचे श्लोक आणि करुणाष्टकांचा समावेश पाठ्यपुस्तकातूनही आवर्जून केला जात असे. इतकंच नव्हे तर घराघरातून ते तोंडपाठ करवून घेतले जात असत. त्यापैकी मनाचे श्लोकांची रचना समर्थांनी आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात केलेली आहे. नक्की कालक्रम सांगायचा तर समर्थांनी चाफळ येथे श्रीरामाचं मंदिर उभं केल्यानंतरच्या काळात या २०५ श्लोकांची रचना झालेली आहे. समर्थांची श्रीरामभक्ती, त्यांचं वैराग्य आणि संतत्व परिपक्व झाल्यानंतरची ही काव्यरचना आहे. करुणाष्टकांची रचना मात्र समर्थांच्या साधकावस्थेच्या प्रारंभीच्या काळात मुख्यतः झालेली आहे.

आपणा सर्वांना ठाऊकच आहे की, श्रीसमर्थ रामदासांचं नाव नारायण होतं आणि त्यांचा जन्म सूर्यदेवतेच्या कृपाप्रसादाने झाला होता. इतकंच नव्हे तर हा पुत्र साक्षात हनुमंताचा अंशावतार असेल असंही

सूर्यदेवतेने नारायणाचे पिताश्री सूर्याजीपंत यांना दृष्टांताद्वारे सांगितलं होतं. विशेष म्हणजे साक्षात श्रीरामाने वयाच्या सातव्या-आठव्या वर्षी नारायणास अनुग्रह देऊन तेरा अक्षरी गुरुमंत्र दिला होता. प्रत्यक्ष श्रीराम हेच नारायणाचे सद्‌गुरु होते, त्यामुळेच बालवयातच नारायणाच्या ठायी विरक्तीचं बीज खोलवर रुजलं होतं.

वयाच्या बाराव्या वर्षी लग्नमंडपातून नारायणाने अगदी निर्धाराने संसार आणि कौटुंबिक सुखाचा त्याग केला आणि थेट नाशिक येथील श्रीरामाची पंचवटी गाठली. या घटनेतच लहानग्या नारायणाच्या अंत:करणात श्रीरामाबद्दलची ओढ आणि लौकिक जीवनाबद्दलची विरक्ती किती प्रखर असेल याची कल्पना करता येते. वयाच्या बाराव्या वर्षी आपण तर खेळगडी होऊन माता-पित्यांच्या प्रेमळ पंखाखाली सुखाने जगत असतो. पण नारायणाने मात्र या वयात खडतर साधनेला सुरुवात केली होती. पाठीशी कुणाचं पाठबळ नसताना, उघड्या जगात कुणाचाही आधार नसताना, कौटुंबिक जीवनातील माया-ममत्वाचे सारे बंध तोडून नारायणाने एका प्रभू रामचंद्रावर सारी भिस्त आणि दृढविश्वास ठेवून तपाचरणाचा मार्ग जवळ केला होता. अशा या कोवळ्या वयातील निराधार अवस्थेत असताना नारायणाच्या अंत:करणात भाव-भावनांचा जो झाकोळ दाटून येत होता त्याचं मोठं उत्कट आणि ह्रदयस्पर्शी शब्दचित्र नारायणाने, म्हणजे बाल वयातील समर्थ रामदासांनी त्यांच्या करुणाष्टकात अतिशय आर्ततेने व्यक्त केलेलं आहे.

नारायणाने गृहत्याग करुन जेव्हा नाशिक पंचवटीची वाट धरली तेव्हा त्याच्या अंगावर फक्त हळदीचे कपडे होते. अशा अवस्थेत गोदावरी काठ धरुन, दिवसरात्र पायी प्रवास करुन अनेक दिवसांनी तो रामनवमीच्या सुमारास पंचवटीतील प्राचीन श्रीराम मंदिरात आला. तोपर्यंत नारायणाने आपलं जन्मगाव जांब नावाचं खेडं वगळता बाहेरचं जग कधी पाहिलंच नव्हतं. नाशिक हे तीर्थक्षेत्र होतं. तेथील जग जसं त्याला ओळखत नव्हतं तसंच तेथील कुणालाही तो ओळखत नव्हता. प्रदीर्घ प्रवासानंतरचं त्याचं बाह्य रुप पाहून त्यास आपुलकीने कुणी जवळ घेईल असं नसावं. मंदिरातील पुजारी व इतर सेवकांचीही त्याला सहानूभूती मिळाली नसावी. अर्थात नारायणाला ती हवी असावी असं वाटत नाही. कारण आपली पूर्व ओळख पुसण्यासाठीच तो अनोळखी जगात आला होता. पण हे जग व तेथील जगरहाटीची त्याला कल्पना नव्हती. पुन्हा आपल्या साधनेसाठी त्याने निवडलेलं टाकळी हे गाव तर नाशिकपासून दूर नंदिनी-गोदावरी संगमावर होतं. अशा परिस्थितीत नारायणाला सुरुवातीचा काळ खूप कष्टाचा गेला असणार यात शंकाच नाही.

टाकळी आणि नाशिक येथील लोक त्याच्याकडे संशयाने पाहात होते. लहानग्या वयात साधना करणाऱ्या या विरक्त मुलाची लोक हेटाळणी करीत होते. उणं दुणं बोलत होते. टीकाटिप्पणी करुन त्याचा उत्साहभंग करीत

होते. नको नको ते प्रश्न विचारीत होते. नारायणाची साधना म्हणजे ढोंग आहे, बुवाबाजी आहे किंवा वेडेपण आहे असं म्हणत होते. खुद्द श्रीरामाच्या पंचवटी मंदिरातही लोक वेडापिसा समजून त्याचा उपहास करीत होते आणि नारायण हे सारं मुकाट्याने सहन करीत होता. राहण्यासाठी निवारा नाही, अंग झाकायला वस्त्रं नाहीत, खाण्यासाठी अन्न नाही, आईची माया नाही की, वडील बंधूंचं प्रेम नाही. कुणाची सहानुभूती नाही, अशा स्थितीत नारायण सुरुवातीच्या काळात दिवस कंठित होता तो केवळ श्रीराम प्रभूंच्या दर्शनाच्या आशेवर. कारण राम हेच त्याच्या जीवनाचं सारसर्वस्व होतं. तोच माता-पिता-बंधू आणि सखा होता. पण श्रीरामाच्या अस्तित्वाची खूण त्याला कुठे सापडत नव्हती. दिवसा नंदिनी नदीच्या पाण्यात उभं राहून सूर्योदयापासून माध्यान्ह होईतो रामनामाचा जप आणि गायत्री मंत्राचं पुरश्चरण करायचं. माध्यान्ही चार घरी भिक्षा मागायची आणि पंचवटीतील श्रीरामाला नैवेद्य दाखवून दोन घास पोटात टाकायचे. दुपारी देवळातच वाचन मनन, चिंतन करायचं, सायंकाळी कथा-कीर्तन श्रवण करुन आरती झाल्यानंतर टाकळीस आपल्या निवासी पोहोचायचं. हे निवास म्हणजे तरी कसं तर नंदिनी नदीकाठी असलेल्या एका टेकडीवरची लहानगी घळ.

या घळीत आलं की तिथला एकान्त मात्र कधी कधी त्यास जीवघेणा वाटे. आईची, बंधूंची आणि जांब येथील

जिवलगांची आठवण होऊन जीव कातर होऊन जाई. मग डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहू लागत. गळ्यातून श्रीरामासाठी आर्त टाहो फुटे. त्याला कळवळून हाक मारताना कंठ दाटून येई. ह्रदयात कारुण्य उतू जाई. आर्तपणे टाहो फोडून श्रीरामरायाची खूण दिसत नाही म्हणून मन उदास-उदास होऊन जाई. रात्ररात्र अशा असहाय्यतेने जागेपणात उलटून जाई. सभोवती एवढं मोठ्ठ जग पसरलेलं असताना आपण पार एकटे आहोत असं वाटे. या एकटेपणाच्या व्याकुळतेने ह्रदयात नुसती कालवाकालव होत असे. मग पुन्हा पुन्हा प्राण कंठाशी आणून प्रभू रामरायाची तो करुणा भाके. श्रीरामरायाने आपल्याला आधार द्यावा, सांत्वना द्यावी, पाठीवर हळुवार हात फिरवून साधनेसाठी आपलं मन खंबीर करावं, पाठबळ द्यावं असं सतत वाटत राही. अशा कारुण्यपूर्ण मनस्थितीत नारायणाने करुणाष्टकांची रचना करुन आपल्या मनाचा कोंडमारा रामास कळवळून सांगितला आहे.

समर्थांच्या संपूर्ण जीवनात एका श्रीरामाखेरीज अन्य कुणासही थारा नव्हता हे खरं. त्यांच्या अवघ्या साहित्यातही त्यांची सारी प्रतिभा हिंडून फिरुन रामाभोवतीच प्रदक्षिणा घालताना दिसते. पण तरीही करुणाष्टकात प्रभू रामचंद्राशी त्यांनी कळवळून साधलेला संवाद, त्याच्या सहाय्यासाठी अंतःकरणाने फोडलेला टाहो काही वेगळाच आहे. त्यात ह्रदयद्रावक तळमळ आहे, व्याकुळता आहे. जगरहाटीने

केलेल्या उपेक्षेमुळे देहमनात दाटलेली उदासीनता आणि नैराश्याचा काहूर आहे. त्यात कातरता आहे. असहाय्यता आहे आणि घनदाट आर्तता आहे. संत साहित्यात भगवंताच्या भेटीसाठी करुणा भाकणाऱ्या मनाची तळमळ, तगमग, आर्तता अनेक अभंगातून आपल्याला दिसते. तुकाराम महाराजांच्या अभंगात तर ती प्रकर्षाने दिसते. तरीसुद्धा करुणाष्टकातील कारुण्याचा, त्यातील आर्ततेचा उमाळा खूप वेगळा आहे. आपल्या ह्रदयाला भिडणारा आणि कातर करणारा आहे यात शंकाच नाही. एखाद्या भल्या मोठ्या जत्रेत आईचा हात धरुन फिरणाऱ्या लहानग्या मुलाचा हात आईच्या हातातून सुटावा आणि तो जत्रेतल्या गर्दीत हरवून जावा, त्यावेळी त्या लहानग्या मुलाची ह्रदयातील अपार व्याकुळता, कालवाकालव, आई डोळ्यांना दिसावी म्हणून डोळ्यात साठलेली उत्कट उत्कंठा, आईविना स्वत:सकट शून्यवत् वाटणारं भोवतालचं जग हे सारं भावनिक वादळ डोळ्यापुढे आणलं तरच करुणाष्टकातील आर्ततेची थोडीबहुत कल्पना येऊ शकते. नारायण तर सतत बारा वर्षे जगरहाटीत एकलेपणाने श्रीरामाच्या दर्शनाची आस धरुन व त्याच्या वाटेकडे दिवसरात्र डोळे लावून होता. त्याच्या आर्ततेची कल्पना करणंही अशक्य. करुणाष्टकातील ही पार्श्वभूमी मनात ठेवून ते जर जाणून घेतले तर त्यातील काव्याबरोबरच भावोत्कट कारुण्यही आपल्या ह्रदयाला भिडल्याशिवाय राहणार नाही.

रामदासांनी रचलेल्या अनेक काव्यरचनांना करुणाष्टके असे संबोधले जात असले तरी या पुस्तिकेत समर्थांनी साधनाकाळात रचलेल्या आठ अष्टकांचाच समावेश केला आहे. एक तर मुलांच्या पाठांतराच्या दृष्टीने ती सोपी तर आहेतच शिवाय ती समर्थ परंपरेत मान्यता पावलेली आहेत. चाफळ आणि सज्जनगड येथे जे दैनंदिन नित्यक्रम होतात त्यातही या आठ अष्टकांचा समावेश आहे. करुणाष्टकांसोबत श्रीसमर्थांची बोधवचनेही या पुस्तिकेत दिली आहेत. ती बहुतांश दासबोधातील आहेत. बोधवचनांच्या अखेरीस दिलेले काही श्लोक पन्नास-साठ वर्षापूर्वी सणावारी किंवा उत्सवाच्यावेळी होणाऱ्या भोजनप्रसंगी आवर्जून म्हटले जात असत. त्यातही बोध आहेच म्हणून ते बोधवचनात समाविष्ट केले आहेत. या करुणाष्टकांच्या व बोधवचनांच्या वाचन-पाठांतराने तुमची मनं समर्थांप्रमाणे भगवंताबद्दलच्या उत्कट आर्ततेने भरुन राहोत आणि त्या उत्कट आर्ततेने हृदयस्थ गंगा निर्मळ होवो हीच समर्थचरणी प्रार्थना.

**जयजय रघुवीर समर्थ !**

**- गुरुदास**